आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ ऑक्टोबर २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाचं सागरी सामर्थ्य वाढवण्यासाठी एकात्मिक सागरी परिसंस्थेची गरज असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन

- चालू आर्थिक वर्षात भारताच्या जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहिल असा जागतिक बँकेचा अंदाज

- देशातल्या विधानसभेच्या ५ आणि लोकसभेच्या एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीसाठी मतदान सुरु

- मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी विरोधी पक्षांचा दिल्लीत मोर्चा

**आणि**

- विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर कर्णधार पदावरून पायउतार

**<><><><><>**

देशाचं सागरी सामर्थ्य वाढवणं आणि संरक्षण क्षमता आणखी बळकट करण्यासाठी, भारताला ताकदवान आणि एकात्मिक सागरी परिसंस्थेची गरज आहे, असं मत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी मांडलं आहे. विशाखापट्टणम इथल्या हिंदुस्तान जहाजबांधणी केंद्रात विविध जहाज प्रकल्पांचं लोकार्पण आणि प्रारंभ केल्यानंतर ते बोलत होते. हिंद महासागर क्षेत्रात सर्वात जलद प्रतिसाद देणारा देश आणि संरक्षण क्षेत्रातला विश्वासार्ह भागीदार म्हणून भारतीय नौदलानं वारंवार आपल्या क्षमता सिद्ध केल्या आहेत. मानवतेच्या दृष्टिकोनातून आपातकालीन परिस्थितीत मदत, चाचेविरोधी कारवाया, बचाव मोहिमा आणि सागरी सुरक्षा क्षेत्रात नौदलानं महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, याकडे सिंह यांनी यावेळी लक्ष वेधलं. एक बळकट राष्ट्रीय सागरी परिसंस्था उभारण्यासाठी, नौदल, जहाजबांधणी केंद्रं, संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, शैक्षणिक क्षेत्रातले तज्ज्ञ, उद्योग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि स्टार्टअप्स यांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज, राजनाथ सिंह यांनी अधोरेखित केली.

<><><><><>

स्वदेशनिर्मित नागरी विमान येत्या दोन वर्षांत मिळावं यासाठी एक संयुक्त प्रकल्प सुरू असल्याची माहिती नागरी उड्डाण मंत्री के. राममोहन नायडू यांनी दिली. नवी दिल्लीत आयोजित इंडियन फाउंडेशन फॉर क्वालिटी मॅनेजमेंट या परिसंवादात ते बोलत होते. पुढच्या दहा वर्षांत शंभरपेक्षा जास्त विमानतळ उभारले जाण्याची शक्यताही नायडू यांनी व्यक्त केली.

पश्चिम आशियातल्या संकटामुळे विमान इंधनाचे दर वाढून ताण निर्माण झाल्याचं केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री के. राममोहन नायडू आज म्हणाले. ते नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी सरकार विमान कंपन्या आणि तेल विपणन कंपन्यांशी या इंधनाच्या दरांबाबत चर्चा करत असून त्यानंतरच यावर निर्णय घेतला जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर हे घाना, कोट द-ईव्होर आणि इथिओपिया इथं आजपासून पाच दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्या दरम्यान, ते तीनही देशांच्या नेत्यांबरोबर द्विपक्षीय बैठका घेतील. यामध्ये द्विपक्षीय मैत्री आणि सहकार्याबाबतचे करार, व्यापार, क्षमता बांधणी, आर्थिक विकास आणि परस्पर संबंधांवर चर्चा होईल. जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवरही परस्पर दृष्टीकोनांची चर्चात्मक देवाणघेवाण होईल. अदिस अबाबा इथं डॉ. जयशंकर हे प्रादेशिक प्रमुखांच्या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवतील. भारताची आफ्रिकेबरोबरची भागिदारी अधिक दृढ करण्याच्या दृष्टीनं हा दौरा अधिक महत्त्वपूर्ण ठरेल, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर आधीच्या अंदाजापेक्षा अर्ध्या टक्क्याने वाढून ७ पूर्णांक १ दशांश टक्के इतका राहील, असा अंदाज जागतिक बँकेनं वर्तवला आहे. व्यापार आणि भूराजकीय क्षेत्रातल्या अस्थिर परिस्थितीतही देशाच्या वाढीचा दर चांगला राहिल्यानं एप्रिलमध्ये वर्तवलेला ६ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढीचा अंदाज वाढून ७ पूर्णांक १ दशांश टक्के केल्याचं जागतिक बँकेनं म्हटलं आहे.

<><><><><>

आसाममधल्या एका लोकसभा मतदारसंघाच्या, तर तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभेच्या प्रत्येकी २, तर पुदुचेरीच्या एका जागेच्या पोटनिवडणुकीसाठी आज मतदान सुरू आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत आसामच्या नागाव मतदारसंघात सुमारे ३८ टक्के, तामिळनाडूत धारापुरममध्ये ३७ टक्क्यापेक्षा जास्त, मदुरांतकम इथं साधारण साडे ३५ टक्के, पश्चिम बंगालच्या रेजीनगर इथं ३९ टक्के, नंदीग्राम इथं ४४ टक्के, तर पुदुचेरीच्या थत्तनचावडी इथं ३९ टक्के मतदान झालं आहे.

मतदारांना आज संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करता येईल. मतमोजणी या महिन्याच्या ९ तारखेला होईल. मतदानाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेतल्या कथित अनियमिततेबाबत आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी विरोधी पक्षांनी आज संसद भवनापासून भारतीय निवडणूक आयोगाच्या मुख्यालयापर्यंत मोर्चा काढला. मात्र, निवडणूक आयोगाच्या मुख्यालयाकडे जाताना वाटेत आकाशवाणी भवनाजवळ हा मोर्चा पोलिसांनी अडवला. यानंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह इतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी संसद भवन रस्त्यावर ठिय्या आंदोलन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. ‘जनसेवेतून देशसेवा आणि सतत समर्पणभाव’ असा हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या सूत्रांचा अवलंब करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत, **नीमवेष्टित युरिया खता**विषयी…

**- - होल्ड.. व्हीसी - --**

*(शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं आणि शाश्वत शेती पद्धतीचा प्रसार करण्याच्या उद्देशानं केंद्रसरकारने गेल्या काही वर्षात अनेक पावलं उचलली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारनं कडुनिंबाच्या तेलाचा थर दिलेलं युरिया खत बाजारात आणलं. दरवर्षी*

*युरियावर नीमतेलाचा थर बसवण्याच्या कामासाठी ५० हजार कोटी रुपयांची तरतूद असते. यापूर्वी असे तुरळक उपक्रम राबवले गेले होते परंतु २०१५मधे युरिया पूर्णपणे नीमवेष्टितच पुरवण्याचा निर्णय केंद्रसरकारने घेतला. त्याकरता तालचेर, रामगुंडम, गोरखपूर, सिंद्री आणि बरौनी इथले खतप्रकल्प पुनरुज्जीवित करण्यात आले.*

*यामुळे शेतकऱ्यांची खतावरच्या खर्चात बचत झाली. मातीचं आरोग्य सुधारलं, पिकांच्या पोषण मूल्यात वाढ झाली, तसंच उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली. त्याचप्रमाणे शेतीव्यतिरिक्त इतर कारणांसाठी युरियाचा वापर करण्याला पायबंद बसला.)*

<><><><>

विकसित भारत – रोजगार आणि उपजिविका हमी अभियानात नव्याने समावेश केलेल्या कामांसह सर्व घटकांची अधिसूचना ग्रामीण विकास मंत्रालयाने जारी केली आहे. या अधिसूचनेनुसार अभियानात ३७५ कामांना मान्यता दिली आहे. आतापर्यंत मान्यता असलेल्या २६६ कामांच्या तुलनेत नव्या अनुसूचीत ४१ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

<><><><>

शाळांमध्ये सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी संविधानच्या उद्देशिकेचं वाचन करण्याचे निर्देश देण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळली.

<><><><>

भारतीय महिला क्रिकेट संघाची, विश्वचषक विजेती कर्णधार हरमनप्रीत कौरनं भारतीय संघाचं कर्णधारपद सोडण्याचा आज निर्णय घेतला. हरमनप्रीतनं समाज माध्यमावर हा निर्णय जाहीर केला आहे.

हरमनप्रीत कौर २०१८ पासून, टी-२० भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार आणि २०२२ पासून एकदिवसीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार होती. तसंच कसोटी क्रिकेटमध्येही तिने भारताचे नेतृत्व केलं होतं. माजी कर्णधार मिताली राज नंतर तिने संघाची सूत्रे हाती घेतली होती. हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली भारताने वर्ष २०१२, २०१६, २०२२ आणि २०२६ मध्ये आशिया चषक जिंकला. तसंच, तिने सलग दोन आशियाई खेळांमध्ये भारताला सुवर्णपदकं मिळवून दिली.

आयसीसी विश्वचषक स्पर्धेत भारताला विजय मिळवून देणारी ती पहिली महिला कर्णधार होती.

**<><><><><>**

प्रसिद्धी ब्रिटिश कादंबरीकार जेफ्री आर्चर यांचं काल राहत्या घरी निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. जेफ्री आर्चर यांनी ब्रिटिश संसदेचे सदस्य म्हणूनही काम केलं होतं. ५० वर्षांत त्यांच्या ३० कोटींपेक्षा अधिक पुस्तकांच्या प्रतींची विक्री झाली होती.

//<><><><><>//